# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.३१/८/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१४) इतिवृत्त**

सोमवार, दिनांक ३१ ऑगष्ट २००९ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे सकाळी ११.३० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त श्री. पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
०३. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०४. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०५. श्री. सुरे सिताराम इसराम
०६. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०७. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०८. श्रीमती मेहरून्नीसा खान हमीद खान
०९. श्री. पांडे विनायक प्रभाकर
१०. श्री. सोनवणे कचरू श्रीपत
११. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१२. सौ. मोमीन सफिया फिरदौस
१३. श्री. शिंदे दामोधर माधवराव

**संवाद :**

श्री.नारायण कुचे : आज वर्तमानपत्रात AMT बस बाबत बातमी आली आहे, मुकूंदवाडी बस स्टॉपवर जावून पहाणी करण्यात आली, साफसफाईची समस्या AMT मधे आहे. वर्तमानपत्रामधे AMT ची वाटचाल ब्ल्यु लाईनकडे अशा बातम्या प्रकाशीत झालेल्या आहेत. बसच्या स्वच्छतेबाबत, मेंन्टनन्स बाबत प्रशासनाने दखल घेतलेली नाही. एकुण किती बसेसचे ॲग्रीमेंट झालेले आहे. AMT उभी राहण्यासाठी महानगरपालिकेच्या सेट्रंल नाका आणि हेड ऑफिस या दोन जागेचा वापर केला जातो, त्याचे भाडे त्यांच्याकडुन आकारण्यात येते काय? रॉयल्टी किती जमा झाली खुलासा करण्यात यावा.

श्रीमती खान मेहरून्निसा : AMT च्या बसेस सुरू आहे त्या कुठल्या भागात चालू आहे. ज्या भागात बसेसची आवश्यकता आहे त्या ठिकाणी बस मिळत नाही. नेहरू नगरसाठी एक वर्षापासून बसेसची मागणी करत आहे त्या ठिकाणी अनेक शाळा चालू असून विद्यार्थ्यांना जाण्यायेण्याचा त्रास आहे. 6 इंग्रजी माध्यमाचे, 2 उर्दु

माध्यमाचे शाळा असून अनेक वेळा मागणी करूनही बस मिळालेली नाही. शहर अभियंता, मा.आयुक्त, मा. सभापती यांना पत्र दिलेले आहे. आतापर्यंत झाले नाही.

श्री.विनायक पांडे : तत्कालिन महापौर श्री.तनवाणी असतांना AMT बस सेवा सुरू केली. माझा अनुभव अत्यंत चांगला असून माझ्या वॉर्डात 3/4 महाविद्यालये आहेत. माझ्या वार्डात AMT बसची सुविधा निर्माण केली त्याचा फायदा हजारो नागरीकांना होत आहे. माझ्या वार्ड पासुन ते औरंगपुरा पर्यंत भाडे फक्त 5 रूपये आकारले जाते परंतु ॲटो रिक्शा चालक तेच भाडे 25 ते 50 रूपये आकारतात. चार वर्षापासून AMT बसेस चालत आहे त्याचे देखभाल दुरूस्तीकडे प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे जेणे करून नागरीकांना चांगली सुविधा प्राप्त होईल.

श्री.भगवान घडमोडे : AMT चा उपक्रम हा चांगला आहे मा.श्री.तनवाणी यांनी चांगला उपक्रम सुरू केलेला आहे परंतु प्रशासनाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे AMTच्या बसेस सुस्थितीत असणे नागरीकांना चांगली सेवा मिळणे हि एवढी माफक अपेक्षा जनतेला आहे. प्रशासनाने खुलासा करावा की प्रशासन कोणती काळजी घेतो तसेच त्यावर प्रशासनाचे कुठले नियंत्रण आहे. नंतर ते नुसते उब्बे हवाली करणार आहेत का?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : श्री. तनवाणी यांनी AMT ची सुरवात केली होती. 20 वर्षामधे महानगरपालिकेने चांगला प्रयोग सुरू केला तो प्रयोग यशस्वी झालेला आहे परंतु हा चार वर्षांचा कालावधी गेलेला आहे तर नियंत्रण अधिकारी यांचेकडुन खुलासा हवा आहे की, करारनामाप्रमाणे किती बसेस पाहिजे होत्या. चार वर्षात बसेस पासुन किती रॉयल्टी जमा झालेली आहे. सर्व सदस्यांना विनंती आहे की, वर्तमानपत्रात बातमी आल्यावर त्या बातमी ऐवजी प्रशासनाकडे याबाबतीत कोणती माहिती आहे ती जाणुन घ्यावी.

श्री.नारायण कुचे : वर्तमानपत्रात बातमी आल्यावर प्रत्यक्ष पहाणी केली आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : लोकमत वर्तमानपत्राने महानगरपालिकेकडे लक्ष दिले त्याबाबत लोकमतचे अभिनंदन. जी वस्तुस्थिती समोर आणली आहे त्याबाबत विचार हाणे अपेक्षीत आहे. वर्तमानपत्रामधे ज्या ज्या बातम्या आलेल्या आहे त्याबाबतीत प्रशासनाला वाटले की, चुकीचे आहे तर त्यावर खुलासा व्हावा.

श्री.प्रशांत देसरडा : पुर्ण भारतात असा प्रकल्प नसेल, महानगरपालिकेने एक पैशाचीही गुंतवणुक केलेली नाही. AMT बस सेवा हि चांगली स्वच्छ सेवा देणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात जेवढया महानगरपालिका आहेत तेथे काय परिस्थिती आहे. पुणे, मुंबई महानगरपालिका असेल किंवा अकोला महानगरपालिका असेल, सदरील प्रपोजलकडे चांगल्या हेतुने बघीतले पाहिजे. सदर वृत्तपत्र माझ्या वॉर्डात आहे. वर्तमानपत्राची दखल घेणे मला भाग आहे त्यामुळे स.सदस्यांनी गैरसमज करून घेवू नये. त्यामुळे AMT कडे चांगल्या हेतुने बघावे व ज्या त्रुटी आहे त्या दुर करण्याचा प्रयत्न करावा.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : औरंगाबाद शहरात जानेवारी 2006 मधे बीओटी तत्वावर AMT सेवा सुरू केली. 10 वर्षाचा सेवाकाळ संबधीत संस्थेला दिला आहे करारनाम्यामधे एकुण 100 बसेस खरेदी करायला पाहिजे होत्या 73 बसेस शहरात धावतात. 100 बसेस खरेदी करण्यासाठी संस्थेसोबत पत्रव्यवहार चालु आहे. त्यांची अडचण म्हणजे ज्या 73 बसेस आहे त्यासाठी पार्कींगची सोय उपलब्ध नाही. सुरवातीस पुष्पनगरी येथे पार्कींगची वर्षभर सोय उपलब्ध होती. साफसफाई करण्यासाठी,वॉशिंग करण्यासाठी त्या ठिकाणी वर्कशॉप टाकण्यात आले होते, परंतु नागरीकांनी आणि संबधीत नगरसेवकांनी ती जागा बदलायला लावली. एन 6 येथील वर्कशॉपवर स्थलांतरीत केले परंतु पार्कींगकरण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. रस्त्यावर बसेस उभ्या कराव्या लागतात. करारनाम्यामधे महानगरपालिका जागा उपलब्ध करून देणार आहे. रेल्वेस्टेशन, सत्यविष्णु हॉस्पीटल जवळ एन 12 येथील जागा घेण्याच्या प्रयत्नात आहे. सदरची अडचण दुर झाल्यास बसेस स्वच्छ ठेवता येईल देखभाल दुरूस्ती करता येईल. 30 लाख रूपये रॉयल्टी वर्षाला प्राप्त होत आहे. एक पैसाही न टाकता महानगरपालिकेस फायदा होत आहे. अहमदनगर महानगरपालिकेचे पदाधिकारी औरगाबाद AMT ची बससेवेची माहिती घेण्याकरीता आले होते.

श्रीमती खान मेहरून्निसा : कुठल्या कुठल्या रूटवर बसेस चालतात याबाबत माहिती दिलेली नाही.

अति.शहर अभियंता : 25 रूटवर बसेस चालतात सदरील रूट शासनाकडुन मंजूर करून घेतलेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा : विद्यार्थ्यांना पास देण्याबाबत काय झाले.

अति.शहर अभियंता : विद्यार्थ्यांना पास देण्यास भाग पाडले आहे पैसे परतावा मिळण्यासाठी पाठपुरावा करत आहे.

मा.सभापती : स.सदस्या वारंवार मागणी करत आहे त्यांच्या वार्डात बस सुरू करण्याची कार्यवाही सुरू करावी.

अति.शहर अभियंता : लवकरात लवकर बस सुरू करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.प्रशांत देसरडा : सर्वसाधारण सभेत जो ठराव ठेवला होता तो पास झालेला आहे. त्याची पुर्तता प्रशासनाने लवकरात लवकर करावे. 50% डिफरन्सची मागणी केलेली आहे.

श्री.सतिष कटकटे : पासेसचे अर्ध्ये पैसे महानगरपालिकेने भरावेत असा करारनामा झालेला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : आत्तापर्यंत किती विद्यार्थ्यांना पासेस दिलेल्या आहेत.

मा.सभापती : रॉयल्टीमधून कापण्यात यावेत.

श्री.खान मेहरून्निसा : 73 बसेसची क्रमांकानुसार यादी ची माहिती द्यावी.

मा.सभापती : पुढील बैठकीत सविस्तर सर्व माहिती देण्यात यावी.

श्रीमती सफिया मोमिन : वार्डात पाहिजे तशी स्वच्छता होत नाही. फॉगींग, ॲबेटची फवारणी होत नाही.

मा.सभापती : आरोग्य वैद्यकीय अधिकारी बैठकीस नसल्याने पुढील बैठकीत विषय घेण्यात येईल.

श्रीमती खान मेहरून्निसा : मा.आयुक्तांनी आदेश दिले होते की, ज्या ज्या ठिकाणी रोडवर खड्डे पडलेले आहे त्या ठिकाणी पॅचवर्क करण्यात यावे परंतु सदरील काम करण्यात आलेले नाही. सध्या सणांचे दिवस आहे.

मा.सभापती : काम सुरू करण्यात आले आहे.

श्री.प्रशांत देसरडा : मागील वेळेस टाउन प्लॅनिंग विभागास भेट दिली होती त्यात बरेचशे ले आउट पेंडिग असल्याचे दिसुन आले. ले आउट धारक बांधकाम परवानगी मागतात त्यांना ॲटो डिसीआर सिस्टीम ने दिली जाते. ठराविक अधिकाऱ्यांची अडवणुक करतात या विषयाशी सामना सर्व नागरीकांना करावे लागते. छोटा बंगलाधारक जर परवानगी घेण्यासाठी आला तर त्याला सर्वांत जास्त त्रास आहे. बिल्डर लोकांचे ले आउट, परवानगी त्याचे नॉर्मस् हे त्यांच्या आर्किटेक कडुन बसवुन घेतले जातात. असेच एक प्रकरण आहे इटखेडा परिसरात एका ले-आउटला परवानगी दिली मंजूरी दिली. ले आउटची मंजूरी देत असतांना 10 टक्के ओपन स्पेस घ्यायला पाहिजे. डिपी रोड जात असेलतर डिपी रोड घ्यायला पाहिजे. अंतर्गत ले-आउटचे रोड हस्तांतर करून घेतले पाहिजे. ती आपली जबाबदारी आहे. परंतु संबधीत ले आउटमध्ये एज्युकेशन पर्पेजसाठी जमीन राखीव ठेवावी लागली. दहा टक्के ओपन स्पेस सोडुन शैक्षणिक वापरासाठी जमीन सोडायला लावली. हे चुकीचे आहे संबधीत ले-आउटधारकाने आपल्याकडे येवू नये त्यांनी 20 बाय 30 ची प्लॉटिंग करून विकुन टाकावी. आज त्या ठिकाणी मार्केट रेट प्रमाणे दहा टक्के खुली जागा रस्त्याची जागा सोडली, सिटी डेव्हलपमेंट, बेटरमेंट चार्जेस भरणे हे सर्व कॉस्टिंग काढले तर एक एकरचा ले-आउट करायचा असेल तर 50 टक्के जागा ओपन सोडावी लागेल. ज्याला जे वाटेल ते नियम लोकांची हराशमेंट होते, असे किती ले-आउट आहे की, जे एज्युकेशन वापरासाठी जागा सोडलेल्या आहे. प्रत्येक ले-आउटधारक स्वतंत्र आला असता तर त्यांनी सर्वांनी मिळुन मंजूरी घेतली आहे. कोटयावधी बेटरमेंट चार्जेस भरलेले आहे.

स.सं.नगर रचना : रेखांकनाचे क्षेत्र जर 2 हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र असेलतर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे ॲमिनिटी स्पेस म्हणून जो टेबल दिलेला आहे त्यानुसार जागा ठेवावी लागते.

श्री.रविकांत गवळी : स.सदस्यांनी जो विषय काढला त्यात सहा.संचालक नगर रचना यांनी एमआरटीपी ॲक्टनुसार बरोबर आहे. परंतु ते दोन हेक्टरमध्ये पाच एकर आहे. सदरील जो ले आउट मंजूर झालेला आहे तो किमान 10 एकर मध्ये झालेला आहे. परंतु त्याचे मालक सहा आहे आणि गट नंबर 64, 68, 69 आणि 70 आहे. आज रोजी एका मालकीच्या नावावर दोन पीआर कार्ड जर असेल तर बांधकाम परवानगी देतांना त्यांना एकत्रिकरण करण्याचा सल्ला देण्यात येतो. सहा वेगवेगळे मालकाचे वेगवेगळे गट असतांना आपण रेखांकन मंजूर करता वेळेस आपण एकत्रीकरण केले आहे काय? वेगवेगळे आले असते तर रिर्झवेशन ठेवण्याची आवश्यकता नसती. चार वेगवेगळे गट

| | |
|---|---|
| | आहे. इटखेडा परिसरात शाळेसाठी रिझंवेशन नसते तर ठेवले असते. आरक्षण नसतांना ठेवावी लागली. |
| श्री.भगवान घडमोडे | : टाउन प्लॅनिंग विभागाकडे सक्षमपणे लक्ष केंद्रित केले पाहिजे. |
| मा.सभापती | : जे रिझर्वेशन टाकलेले आहे ते शासनाने टाकलेले आहे की महानगरपालिकेने टाकलेले आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : सदरील व्यक्ति कोण आहेत व त्यांनी कुठे कुठे विकासाचे कामे केलेले आहेत. |
| मा.सभापती | : सहा व्यक्तिंचे नांवे सांगण्यात यावे. |
| सहा.संचालक न.र. | : सदरील रेखांकनाचे जमीनीचे मालक मे.नाथ सिडस् लि. श्री.सतिष कागलीवाल, श्रीराम असोसिएट, श्री.रामप्रसाद कदम, गनीमा इंन्टरप्रायजेस श्री.संजय शांतीलाल मुथीयान, अरिहंत असोसिएट श्री.संतोष शांतीलाल मुथीयान, अपुर्व इंन्टरप्रायजेस श्री.विनोद सुराना, सिद्धी असोसिएट, श्रीमती मिनाताई कदम, विश्वा इन्टरप्रायजेस, मधुकर सावजी. असे ओनर आहेत. |
| मा.सभापती | : वादग्रस्त कुणी नाहीत. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : सदरील व्यक्तिंचा पहिलाच विकास आराखडा होता का की यापुर्वीही होते. |
| सहा.संचालक न.र. | : त्याबाबतीत माहिती नाही. मा.सभापती यांनी ज्या सुचना दिल्या होत्या त्यानुसार इथे विकास योजनेद्वारे आरक्षण ठेवलेले नाही. रेखांकन मंजूर करतांना 2 हेक्टरच्या वरती क्षेत्र असल्यामुळे टेंनन्ट डेन्सीटी आणि पॉप्युलेशन काढुन या ठिकाणी नर्सरी आणि प्रायमरी शाळेसाठी 7046 स्के.मि. चे आरक्षण ठेवण्यात आले. |
| मा.सभापती | : शासनाचे रिझर्वेशन नाही महानगरपालिकेने ले-आउटमध्ये रिझर्वेशन ठेवलेले आहे. याची मालकी कुणाकडे आहे. |
| श्री.भगवान घडमोडे | : त्याच्या आजूबाजुस शाळेचे रिझर्वेशन आहे काय? |
| मा.सभापती | : प्रशासनाने खुलासा करावा. |
| सहा.संचालक न.र. | : विकास योजना बघुन सांगावे लागेल. |
| श्री.प्रशांत देसरडा | : महानगरपालिकेच्या नियमात जागा सोडायचे असेल तर त्या गृहस्थाने जवळजवळ 1 कोटी रूपये डिपी रोडमध्ये 7 कोटी रूपये ले-आउटमध्ये जातो. त्यांनी जर एकत्रीत ले आउट सादर केला नसता तुकडया तुकडयात ले आउट सादर केला असता तर प्रशासनाला डिपी रोडचे पैसेसुध्दा द्यावे लागले असते. डिपी रोडच्या माध्यमातुन जर महानगरपालिकेचे 1 कोटी रूपये वाचले असेल, बेटरमेंटच्या माध्यमातून 1 कोटी आले असतील प्रशासन विशेष बाब म्हणुन सुट देवू शकते काय? |
| श्री.भगवान घडमोडे | : जे नियमाने परवानगी मागण्यासाठी आले त्यांच्यावर अन्याय आणि दुसरीकडे अनाधिकृत वसाहती उभ्या राहु लागल्या आहेत. |
| मा.सभापती | : ले आउटमध्ये 60 मीटर रस्ता जो घेतलेला आहे त्याचा मोबदला टि.डी आर., एफ एस आय दिलेला आहे काय? |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : रोड त्या ठिकाणी आहे काय? |
| मा.सभापती | : डांबरी रस्ता त्या ठिकाणी अस्तित्वात आहे. प्रशासनाने खुलासा करावा की, 60 मिटरचा रस्ता कोणत्या ले आउटमध्ये आहे काय? |

सहा.संचालक न.र. : पहाण्यात आलेला नाही.

मा.सभापती : 60 मीटरच्या रस्त्याचा मोबदला टिडीआर,एफएसआय, दिलेला आहे काय? सदरील व्यक्तिंनी सेल्फ डेव्हलपमेंट केलेले आहे. डांबरी रोड तयार केलेला आहे. आजूबाजुस वस्ती डेव्हलप झालेली आहे. त्यांचे सेल्फ डेव्हलपमेंट केलेले आहे महानगरपालिकेने एक रूपयाही खर्च केलेला नाही. प्रशासनाने खुलासा करावा की, महानगरपालिकेने रोड केले का की विकासकाने रोड तयार केले खुलासा करण्यात यावा.

सहा.संचालक न.र. : विकासकाने रस्ता तयार केला.

श्री.प्रशांत देसरडा : उधारीत परवानगी दिली जाते, बेटरमेंट चार्जेस न भरणाऱ्यांना परवानगी दिली जाते, चार वेगवेगळे तुकडे सादर त्यांनी केले असते.

मा.सभापती : प्रशासनाने एक गोष्ट स्पष्ट केलेली आहे की, सदरील रिझर्वेशन शासनाचे नाही. आपण ले आउटमध्ये केलेले रिर्झवेशन आहे.

श्री.प्रशांत देसरडा : सदरील व्यक्तिंनी अर्ज दिला असेल तर विकासाच्या दृष्टीकोणातुन आहे. 5 हेक्टर जमीनीचे ले आउट दाखल करणे म्हणजे एक संपुर्ण वार्ड निर्माण होणे तर त्यांना मा.आयुक्तांच्या अधिकारात, सर्वसाधारण सभेच्या अधिकारात असेल तर त्यांना सुविधा देण्यात यावी.

मा.सभापती : 60 मीटरचा रस्ता विना मोबदला दिलेला आहे. प्रशासनाचे मत आहे की 9 हेक्टर पेक्षा जास्त रेखांकनाची जागा आहे म्हणुन सोडावी लागते. 6 ओनर आहेत त्यांनी वेगवेगळे सादर न करता एकत्रीत सादर केले आहे. टिपी सेक्शनचीही यात चुक नाही. शासनाचे रिझर्वेशन नाही. मालकी कुणाकडे आहे याचा खुलासा प्रशासनाने करावा.

सहा.संचालक न.र. : मालकी ओनरकडे आहे.

मा.सभापती : उद्या शाळा बांधण्याची परवानगी मागीतली तर आपल्याला परवानगी द्यावी लागेल.

सहा.संचालक न.र. : त्या जागेचा फक्त वापर निश्चित केलेला आहे.

मा.सभापती : गट क्रमांक 64, 67, 68, 69, 70, 71 इटखेडा या ठिकाणी सात ओनरनी महापालिकेकडुन मंजूरी घेतलेली आहे. अर्जदार यांनी वेगवेगळी ले आउट दाखल केले असते तर अर्जदारांना त्यांच्या रेखांकनामध्ये प्रायमरी शाळेकरीता जागा सोडावी लागली नसती. वरील बाबी पहाता ले आउटमध्ये ठेवलेली नर्सरी व प्रायमरी शाळेकरीता ठेवलेली जागा वगळून प्रशासनाने रेखांकन मंजूरीबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

मा.सभापती : मा.आयुक्तांना बैठकीस जायचे आहे, कुशीनारा बाबतीत चौकशी समिती नेमण्यात आली होती त्यानुसार तीन कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आले आहे. त्यामुळे मा.आयुक्तांचे अभिनंदन करण्यात येते तसेच दुसरा मुद्दा म्हणजे स्थायी समितीची बैठक स्थगीत ठेऊन सलिम अलि सरोवर येथे पहाणी करण्याकरीत गेलो होतो त्याठिकाणी ड्रेनेजचे पाणी येत होते एचटीपीचा प्रोजेक्ट करण्यात यावा म्हणून स्थायी समितीने प्रशासनास आदेशीत केले होते. त्यानुसार प्रशासनाने काम करून टेंडर काढण्यात आले आहे तीसरा मुद्दा म्हणजे जकात विभाग,आस्थापना विभागाचा अहवाल

मागविण्यात आला होता तो अहवाल सादर केलेला आहे. 1.60 कोटीचा फायदा झाला आहे. मागील वर्षी शाळेच्या ड्रेस प्रकरणामधे जास्त रक्कम गेली होती मा.आयुक्तांनी लक्ष केंद्रित करून तेथुनच एक कोटी पस्तीस लाखाची बचत केली आहे. तीन विषयामधे एक कोटी साठ लाखांचा फायदा झालेला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : प्रशासनास अधिकार देण्यात यावे.

मा.सभापती : ज्या अधिकाऱ्यांनी चांगले काम केलेले आहे त्यांचे अभिनंदन करण्यात येते, एका प्रकरणातच एक कोटी पस्तीस लाखाची बचत झालेली आहे. मा.आयुक्तांना विनंती करण्यात येते की, ज्या अधिकाऱ्यांमुळे फायदा झाला आहे त्यांना एक आगाऊ वेतनवाढ देण्यात यावी.

श्री.भगवान घडमोडे : ज्या अधिकाऱ्यांनी चांगले काम केले आहे. त्यांचे अभिनंदन करून त्यांना एक आगाऊ वेतनवाढ देण्याचे अधिकार मा.आयुक्तांना देण्यात यावे.

श्री.प्रशांत देसरडा : मा.आयुक्तांचा पुर्व इतिहासाबाबत ऐकण्यात आले आहे, मा.आयुक्तांनी 200 ते 250 कर्मचाऱ्यांचे वेतनवाढ व इतर सुविधा त्यांच्या कार्यकाळात दिलेल्या आहेत.

मा.सभापती : सलिम अलि सरोवरात चार कोटी तीन लाख खर्च करून ड्रेनेजचे पाणी जमा करत होतो.

श्री.प्रशांत देसरडा : प्रत्येक विभागास वाटते की, मी चांगले काम केले आहे तर सर्वांचाच अहवाल मागविण्यात यावा.

मा.सभापती : कोणाकोणामुळे फायदा झाला आहे याबाबतीत मा.आयुक्त माहिती घेतील आणि त्यांना वेतनवाढ देण्याची शिफारस स्थायी समिती करत आहे.सलिम अलि सरोवर आणि कुशीनारा,त्रिवेणी नगर बाबत मा.आयुक्तांनी जे तात्काळ निर्णय घेतलेला आहे कोटयावधी रूपयांची जमीन महानगरपलिकेला मिळणारच आहे प्रकरणाची गंभीरता पाहुन मा.आयुक्तांनी तात्काळ निर्णय घेतलेला आहे त्याबाबत स्थायी समितीचे सर्व सदस्य मा.आयुक्त साहेबांचे अभिनंदन करीत आहे. याची कॉपी शासनाकडे पाठविण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : मा.आयुक्तांनी जो निर्णय घेतलेला आहे तो वाखण्याजोगा आहे, अभिनंदन करण्यात आलेले आहे. त्यामधे अंमलबजाणी निर्णय घेतलेला आहे तो चांगला आहे. मा.सभापतींच्या कार्यकाळास 16 महिने पुर्ण झालेले आहे. दहा ते बारा चौकशी लावण्यात आलेल्या आहे त्यातील काही अहवाल आलेले आहेत त्यावर एक स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात यावी. आचारसंहितेनंतर बैठक आयोजित करण्यात यावी जेणे करून दिड महिना चौकशी अहवालावर अभ्यास,चर्चा करता येईल.

मा.सभापती : स्थायी समितीकडे जे जे अहवाल आले आहे त्यावर दिनांक 03.09.2009 च्या बैठकीत चर्चा केली जाईल.

श्री. विनायक पांडे : ई टेंडरमधे शॉर्टसर्कीट झालेले आहे त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

अति.शहर अभियंता : ईटेंडरमधे जे पाच ते सहा पी.सी.ज होते हे जळुन खाक झालेले आहे. सिस्टीम मधे काही समस्या निर्माण झालेली नाही. सिस्टीम चालू आहे.

श्री.सिताराम सुरे : हर्सुल येथील ट्रिटमेंट प्लँन्ट असुन त्या ठिकाणी प्रत्येक शिफ्टमधे नऊ कर्मचारी आहेत असे एकुण 27 कर्मचारी आहेत या कर्मचाऱ्यांची त्या ठिकाणी आवश्यकता आहे काय? त्या ठिकाणी स.सदस्य श्री.रविकांत गवळी व मी गेलो असता एकही कर्मचारी हजर नव्हता त्या ठिकाणी कोटयांवधी रूपयांचे पाईप,पावडर व इतर साहित्य पडलेल्या अवस्थेत आहे. त्या ठिकाणी एवढया कर्मचाऱ्यांची गरज नसेल तर ते कमी करण्यात यावेत. गेल्या कित्येक वर्षापासून कर्मचारी त्या विभागात कार्यरत आहे.

अति.शहर अभियंता : स.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो योग्य आहे, उप अभियंता त्या ठिकाणी गेले असता त्यांनाही त्या ठिकाणी कुणी आढळुन आले नाही. त्यांचा अहवाल आल्यावर कर्मचाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल तसेच जल शुध्दीकरण युनीट आहे. त्या कर्मचाऱ्यांना दुसरीकडे टाकुन चालणार नाही.

श्री.सिताराम सुरे : कर्मचारी हजर राहत नसेल तर कार्यवाही करावी लागेल.

अति.शहर अभियंता : त्याबाबतीत काळजी घ्यावी लागेल. योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.प्रशांत देसरडा : स.सदस्य श्री.रविकांत गवळी आणि श्री.सिताराम सुरे यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत प्रशासनाने समाधानकारक उत्तर दिलेले नाही. हर्सुल ट्रिटमेंट प्लॅन्टवर प्रशानाचे नियंत्रण कशास्वरूपात असते. उप अभियंता केव्हा जातो, कर्मचाऱ्यांची हजेरीबाबत, 27 कर्मचारी कोणत्या कामासाठी आहे यावर नियंत्रण पाहिजे. तेथे कोणी अज्ञात व्यक्तिंने काही टाकले, टाकीमधे काही टाकण्यात आले किंवा जिवीत हाणी झाली तर जबाबादार कोण आहे. जे ट्रिटमेंट प्लॅन्ट असेल, ड्रेनेज प्लॅन्ट असतील, साफसफाईचे छोटे डेपो असतील यांच्या हजेरी केव्हा घेतली जाते. केनॉट प्लेसमधे भेट दिली असता त्या ठिकाणी कार्यरत 17 सफाई कर्मचाऱ्यांपैकी फक्त 7 कर्मचारी हजर होते. ट्रिटमेंट प्लॅन्टचे नियंत्रण कशास्वरूपाचे असते खुलासा करण्यात यावा. ट्रिटमेंट प्लॅन्टच्या ठिकाणी सामान पडलेले आहे असे भंगार सामान कुठे कुठे पडलेले आहे, मनपाच्या प्रत्येक शाळेत 50 हजारांचे भंगार पडलेले आहे.

मा.सभापती : एकाच ठिकाणी सहा सात वर्ष कार्यरत कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्यात.

अति.शहर अभियंता : स्थायी समितीने सुचविल्याप्रमाणे, तपासणी करून बदल्या करण्यातबाबत विचार करता येईल.

श्री.प्रशांत देसरडा : दररोजची देखरेख कशापध्दतीचे असते.

अति.शहर अभियंता : हर्सुल फिल्टर प्लॅन्टला जे कर्मचारी आहेत त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी पाणीपुरवठा विभाग आहे. पाणी पुरवठा विभागात एक उप अभियंता आणि दोन क.अभियंता आहेत. मी सततची मागणी करत आहे की, एक ज्युनिअर इंजिनिअर आणि दोन दुय्यम आवेक्षक ची अत्यंत आवश्यकता आहे. 1 कनिष्ठ अभियंताची बदली झाली. त्याच ठिकाणी क.अभियंता देण्याबाबत मागणी केली आहे.

श्री.भगवान घडमोडे : मनुष्यबळ कमी असतांना काम करीत आहे तरी त्यांना आवश्यक ते मनुष्यबळ पुरविण्यात यावे. एवढ्या जिद्दीने काम करतात, एक वेतनवाढ देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : प्रत्येक वार्डात कर्मचारी वाटप करण्यात आले होते परंतु पुन्हा त्यांना ज्या वार्डात योग्य वाटेल त्या ठिकाणी घेण्यात आले. वार्ड अ मधे 16 वार्डात एक ज्युनिअर इंजिनिअर आहे.

अति.शहर अभियंता : पाणीपुरवठा विभाग, ड्रेनेज विभागाच एक दुय्यम आवेक्षकाची नितांत आवश्यकता आहे.

मा.सभापती : कार्यकारी अभियंता अ कार्यालयास एक दुय्यम आवेक्षक कर्मचारी देण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे : वार्ड ड कार्यालयास पाणीपुरवठयासाठी आणि ड्रेनेजसाठी एक एक ज्युनिअर इंजिनिअर आहे, ज्युनिअर इंजिनिअर देण्यात यावे.

मा.सभापती : प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.नारायण कुचे : पाणी पुरवठयाचे कर्मचाऱ्यांचे काम चांगले आहे त्यांनाही एक वेतनवाढ देण्यात यावी.

श्री.प्रशांत देसरडा : महिलांना सक्षम करण्यासाठी बचत गटासंदर्भात संपूर्ण जगात भारताच चांगल नांव घेतले जात आहे, औरंगाबाद शहरात बचत गटाचे काम अतिशय चांगल्या पध्दतीने सुरू आहे. भवानी नगर येथील बचत गटाची भेट झाली असता एका गोष्टीचा खुलासा झाला, अडीच लाख रूपयाचे लोन महानगरपालिकेतर्फे बचत गटास मंजूर झाले. अडीच लाख रूपयाच्या लोनकरीता पस्तीस हजाराची लाच महानगरपालिकेकडुन घेण्यात आली. सदर महिलांना सल्ला दिला की, एक निवेदन देण्यात यावे तुम्हाला त्रास होईल परंतु बाकी महिला बचत गटांना त्रास होणार नाही. सदरील महिला हया घाबरलेल्या स्थितीत होत्या त्या आपल्या बचत गटाचे नांवसुध्दा सांगायला तयार नव्हत्या. एका महिला कर्मचाऱ्यांने महिलांकडुनच 35 हजार रूपयांची लाच घेतली आहे. जे वार्ड वाईज नेमलेल्या आहेत. त्या उघडपणे भ्रष्टाचार करीत आहे.

मा.सभापती : सभागृहामधे महिला कर्मचाऱ्या विरूध्द गंभीर आरोप लावण्यात आलेले आहे प्रशासनाने खुलासा द्यावा.

श्री.सुर्यवंशी (प्रकल्प संचालक): याबाबतीत स.सदस्यांनी माहिती दिली होती. याबाबतीत चौकशी करून, कुणी दोषी आढळल्यास मा.उपआयुक्त यांचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : बचत गटाच्या नावावर महिलांना त्रास होत आहे, जर हा भ्रष्टाचार झाला असेल आणि ते नाव येत असेल तर त्याची चौकशी करून संबधीतास निलंबीत करून त्याच्याविरूध्द पोलीस गुन्हा नोंदविण्यात यावा.

मा.सभापती : स.सदस्यांनी गंभीर आरोप लावण्यात आलेले आहे, याप्रकरणी दोन दिवसांच्या आत उपआयुक्त (प्र) यांचे मार्गदर्शनाखाली चौकशी करून पुढील बैठकीत अहवाल सादर करावा.

श्रीमती खान मेहरून्निसा : औरंगाबाद शहरात एकुण किती बचत गट आहे प्रत्येक वार्डात किती बचत गट आहे याबाबत माहिती देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : सिडको येथील साफसफाईचे टेंडर देऊन आज नऊ महिने झालेले आहे. नऊ महिनें पासून बचत गटाला मानधन मिळालेले नाही कारण की, पीएफ आणि एस आय नंबर मिळालेले नाही. वारंवार त्यांनी ऑफिसमधे तक्रार केलेली आहे महानगरपालिकेकडुन पत्र मिळालेले नसल्यामुळे पीएफ आणि एस आय नंबर काढता आलेला नाही. आजपर्यंत मानधनापोटी एक रूपयाही बचतगटास मिळालेला नाही. प्रशासनास आदेशीत करण्यात यावे.

श्री.भगवान घडमोडे : महिला गटास सक्षम करण्यासाठी क्रांतीकारी पावले उचलण्यात येत आहे परंतु माझ्या वार्डातील साफसफाईचे काम व्यवस्थितरित्या होत नाही. बचत गटाचा एखादा कर्मचारी गैरहजर राहिल्यास प्रशासनाला कर्मचारी लावण्याचा अधिकार नाही.

श्री.प्रशांत देसरडा : प्रशासनाने आदेश काढले की, अमुक कर्मचारीच घ्यावेत.

श्री.भगवान घडमोडे : बचत गटांनी काम करायचे का या ठिकाणी असलेल्यांनी कामे करायची. वर्षानुवर्ष सिडको हडकोचे काम करीत असलेले कर्मचारीच साफसफाईचे काम करीत आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : पुर्वीचे जे कामगार आहेत ते कामगार दिले की ते बचत गटाच्या आदेशाचे पालन करत नाही. बचत गटावर कामगारांचे वर्चस्व आहे.बचत गट हा त्या त्या भागातील पाहिजे.

श्रीमती खान मेहरून्निसा : बचत गटास महानगरपालिकेतील सर्व कामे देण्यात यावीत.

मा.सभापती : बचत गटास मानधन देण्यात येते काय? नियमानुसार चार टक्के मानधन दिले का, खुलासा करण्यात यावा.

प्रकल्प संचालक(श्री.जावरे): चार टक्के मानधन बचत गटास महानगरपालिकेतर्फे द्यायचे आहे त्यामधे अजून पेमेंट झालेले नाही. पीएफ आणि एस आय ची रक्कम as a contractor म्हणुन ज्या त्या खात्यावर जमा करायची होती ती केलेली नाही हि अट महानगरपालिकेने टाकलेली असल्यामुळे पेमेंट झालेले नाही.

श्री.नारायण कुचे : पी.एफ. आणि ई.एस.आय. नंबरसाठी महानगरपालिकेचे पत्र लागेल तेव्हा नबर प्राप्त होईल. 28 बचत गटांनी पैसे जमा केलेले आहे.

श्री.भगवान घडमोडे : पीएफ आणि एस आयसाठी जी संख्या लागते ती संख्या नसल्यामुळे दोन दोन बचत गट एकत्रीकरण करण्यास सांगीतले आहे. बचत गटाचे भांडण चालले आहे. महानगरपालिकेने अटी नियमाचे पालन न करता बचत गट निर्माण केले.

प्रकल्प संचालक : दोन बचत गटाचे एकत्रीकरण केले आहे. 20 पेक्षा जास्त कर्मचारी त्यांच्याकडे उपलब्ध आहेत.

श्री.नारायण कुचे : पीएफ आणि ईएसआय नंबरसाठी पत्र देण्यात आलेले नाही.

प्रकल्प संचालक : पीएफ आणि ईएसआय नंबरसाठी पत्राबाबत माहिती घेण्यात येईल.

मा.सभापती : महिला बचत गटाबाबत रिपोर्ट उपआयुक्त (प्र) यांचेकडे देण्यात यावे, महिला बचत गटाला नियमानुसार पीएफ आणि एस आयसाठी नियमानुसार कागदपत्र देण्यात येऊन जे देता येईल ते द्यावे.

श्री.भगवान घडमोडे : कामगार अधिकारी यांचे चौकशी अहवाला बाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : कामगार अधिकारी यांचा खुलासा आलेला आहे. संचिका मा.आयुक्तांकडे आहे संध्याकाळ पर्यंत निर्णय होईल.

श्रीमती सफिया मोमीन : मनपाच्या शाळेत मुलांना शुज, स्कुल बॅग दिली जात नाही.

श्री.प्रशांत देसरडा : मनपाची आर्थीक परिस्थिती बिकट आहे शासनाने ड वर्ग महानगरपालिकेची जकात रद्द केलेली आहे. प्रशासन सर्व प्रकारची बचत करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. मनपाच्या आवारात आयडीबीआय बँक आहे. रस्त्यावरील लाईट सुरू राहिल्यास सामान्य नागरीक फोन करून सांगतो परंतु गेल्या कित्येक वर्षापासुन आयडीबीआय बँकेचे लाईटबील कोण भरत आहे. त्या ठिकाणी दोन तीन एसी दिवस रात्र चालु आहेत.

मालमत्ता अधिकारी : महानगरपालिका मुख्य कार्यालयामधे आयडीबीआय बँक आहे या बँकेचे ॲग्रीमेंट सिटी इंजिनिअर यांनी केलेले आहे त्याच्या अटी शर्ती किंवा लाईटबील बाबत विद्युत विभागाकडुन माहिती घ्यावी.

मा.सभापती : मी ज्यावेळी स्थायी समितीचा सदस्य होतो व श्री.तुपे सभापती होते त्यावेळेस बँकेचा मुद्दा उपस्थित केला होता आयडीबीआय बँकेशी महानगपालिकेचा काही संबध नाही. महानगरपालिकेने युनायटेड वेस्टर्न बँकेला जागा दिलेली आहे. आयडीबीआय बँक केव्हा आली त्यावेळीही अधिकाऱ्यांना माहिती नव्हती व आजही नाही. ॲग्रीमेंट संपलेले आहे. आयडीबीआय बँक आणि युनायटेड वेस्टर्न बँक बाबत संपुर्ण खुलासा पुढील बैठकीत देण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : मागील बैठकीत पैठणगेट येथील जागेच्या पीआर कार्ड बाबत चर्चा केली होती. शहराच्या मध्यवर्ती भागात महानगरपालिकेच्या जागा आहेत. त्याची लिज संपलेली आहे किंवा नाही भाडे वसुल होते किंवा नाही याबाबत माहिती अद्यापपर्यंत नाही. श्रीमान श्रीमती दुकानाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे, औषधी भवनची जागाही महानगरपालिकेच्या मालकीची आहे. प्रशासनाने खुलासा करावा की, पीआर कार्ड महानगरपालिकेच्या मालकीचे आहे काय?

श्री.सतीश कटकटे : लिज संपले असेल तर वाढवून द्यावे.

मा.सभापती : करारनामा तसेच मुळ संचिका आहे काय या सर्व बाबींचा खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी : शहरातील काही दुकाने व जागा लिजवर देण्यात आलेल्या आहेत काही सेवाभावी संस्थांना जागा दिलेल्या आहेत. सदरील जागा सेवाभावी संस्थेला दिली आहे ती त्यांनी सबलिज करून श्रीमान श्रीमतीला दिलेली आहे.

मा.सभापती : मालकी म्हणुन पीआर कार्ड त्यांच्या नावांवर नोंदविण्यात आलेली आहे. औषधी भवनची जागा महानगरपालिकेची आहे.

मालमत्ता अधिकारी : होय.

श्री.रविकांत गवळी : सेवाभावी संस्थेला महानगरपालिकेने दिली परंतु सेवाभावी संस्थेने सबलिज करून श्रीमान श्रीमतीला जागा दिली, पीआर कार्डवर कुणाची नोंद आहे.

मा.सभापती : मालकी महानगरपालिकेची आहे परंतु पीआर कार्डवर श्रीमान श्रीमतीच्या नावावर नोंद आहे.

श्री.रविकांत गवळी : सदरची संचिका उपलब्ध आहे काय? ज्या संस्थेला लिजवर जागा दिलेली आहे सबलिज करून देता येते काय? आज पर्यंत भाडे वसुल करण्यात येते काय?

मालमत्ता अधिकारी : सर्व लिज होल्डरला पत्र दिलेले आहे.

मा.सभापती : भाडे आजपर्यंत काही वसुल झालेले आहे काय?

मालमत्ता अधिकारी : नाही.

श्रीमती खान मेहरून्निसा: गरीबांची दुकाने ताब्यात घेतल्या जातात. श्रीमंत लोकाच्या दुकाने ताब्यात घेत नाही.

श्री.रविकांत गवळी : सेवाभावी संस्थेला लिज दिली सेवाभावी संस्था सबलिजवर श्रीमान श्रीमतीला देते, त्याठिकाणी चार मजली व्यवसायीक इमारत तयार होते महानगरपालिकेच्या जागेवर त्यामुळे येणाऱ्या बैठकीत सविस्तर माहिती प्रशासनाने सादर करावी. अशाच पध्दतीने औषधी भवनचा सुध्दा प्रकार आहे. प्रशासनाने संचिका सादर करून खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : श्रीमान-श्रीमती, औषधी भवन बाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. कुणी चुकीची लिज डिड केली असेल तर ती तात्काळ रद्द करण्यात यावी. पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : पिपल्स जनता बँक बाबतही माहिती देण्यात यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :पिपल्स जनता बँक, शिवालय, मर्कन्टाइल बँक, सारस्वत बँक या सर्व नाल्यावर जागा दिलेल्या आहे.

मा.सभापती : बी.एम.सी. बँक, सारस्वत बँक महानगरपालिकेने लिजवर दिलेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा : औरंगाबाद पिपल्स बँक हि शहरातील सर्वांत जुनी बँक आहे वार्षिक भाडे चार हजार घेण्यात येते. त्या खाली तीन दुकाने आहेत. एक सुंदर टि हाऊस, सायम आणि एक टेलरची या 4 दुकानांकडुन बँकेला महिना 50 हजार भाडे दिले जाते. महानगरपालिकेची 15000 कोटीची मालमत्ता आहे.

श्री.रविकांत गवळी : शहरात महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्ता एवढया जास्त प्रमाणात आहे की जकात संदर्भात चर्चा करण्याची आवश्यकता नाही एवढी वसुली होऊ शकते.

मा.सभापती : महानगरपालिकेची 15 हजार कोटींची मालमत्ता आहे परंतु त्याची देखभाल करण्यासाठी प्रशासन उदासिन आहे. मुळ संचिका सगळयांच गायब झालेल्या आहेत. पुढील बैठकीत प्रशासनाने संपुर्ण खुलासा करावा. संबधीतांनी सब लिज केली असेल तर पीआर कार्ड ऑफिसमधे संबधीत ऑफिसमधे पत्र देऊन नाव काढण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : स.सदस्य श्री.संजय जोशी व मी वारंवार मोबाईल टॉवर बाबत चर्चा केलेली आहे, चौकशी लावण्यात आलेली असून अहवालही प्राप्त झालेला आहे. 80 टक्के मोबाईल टॉवरला परवानगी नाही. प्रशासकीय अधिकारी यांनी चार दिवसांपुर्वी दोन मोबाईल टॉवर सिल केले मोबाईल टॉवर

धारकांना 3.50 लाख रूपये भरावे लागणार आहे. किमान 7 कोटी मालमत्ता कर वसुल होऊ शकतो. येत्या बैठकीत अहवाल सादर करण्यात यावा.

मा.सभापती : मोबाईल टॉवरबाबत पुढील सभेत माहिती देण्यात यावी. एक प्रस्ताव आलेला आहे केंद्र शासनाने महिलांना स्वायत्त संस्थेत 50 टक्के आरक्षण धोरण पास केल्या बाबत मा.राष्ट्रपती श्रीमती प्रभाताई पाटील, श्रीमती सोनिया गांधी यांचे सभागृहात अभिनंदन करण्यात यावे.

श्री.प्रशांत देसरडा : मा.पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग यांचे अभिनंदन करण्यात यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : युपीए सरकारचे अभिनंदन करण्यात यावे.

श्री.विनायक पांडे : लोकसभा आणि राज्यसभेच्या सर्व सदस्यांचे अभिनंदन करण्यात यावे.

श्री.प्रशांत देसरडा : योग्य ठराव ठेवण्यात यावे त्यास आमचे अनुमोदन आहे.

मा.सभापती : मा.राष्ट्रपती श्रीमती प्रभाताई पाटील, मा.पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग, युपीए सरकार लोकसभा आणि राज्यसभेच्या सर्व सदस्यांचे अभिनंदन करण्यात येऊन बहुमताने मंजूर करून केंद्र शासनाकडे पाठविण्यात येत आहे.

मा.सभापती : स्थायी समिती सभागृहातील खुर्च्या बदलुन नविन खुर्च्या त्वरीत पुरविण्यात याव्यात.

**<u>विषय क्र. १३१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६५ रमानगर येथे जालना रोड ते नालंदा विद्यालय, पन्नालालनगर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.११,३५,२१०/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेची मान्यता प्राप्त झालेली असुन सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत ८ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ६ निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ९.९९% कमी दराने |
| २. | राजेंद्रसिंग अजितसिंग | अं.प.दरापेक्षा २४.९१% कमी दराने |
| ३. | एम. ए. सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा २३.००% कमी दराने |
| ४. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा २१.९५% कमी दराने |
| ५. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १७.००% कमी दराने |
| ६. | के. बी. पाथ्रीकर | अं.प.दरापेक्षा १६.२३% कमी दराने |

उपरोक्त प्राप्त निविदांपैकी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९१% कमी दराची निविदा राजेंद्रसिंग अजितसिंग यांची आहे. मा. आयुक्त यांनी उक्त निविदा दरास मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी राजेंद्रसिंग अजितसिंग यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९१% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६५ रमानगर येथे जालना रोड ते नालंदा विद्यालय, पन्नालालनगर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २४.९१% कमी दराची राजेंद्रसिंग अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

: ऐनवेळचे विषय :

मा.सभापती : ऐनवेळचे सर्व विषय मंजूर करण्यात येते.

**विषय क्र. १३२ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, हॉटेल सायली ते रविंद्रनगर या १५ मीटर रूंद विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन २००८-२००९ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असुन त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,९६,५००/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त, महानगरपालिका यांची प्रशासकीय मान्यता झाली असुन या कामाचा खर्च शहरी भागात पुनःर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्षाखाली प्रस्तावित आहे.

तरी सदर कामाचे रक्कम रू. रू.१४,९६,५००/- चे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल सायली ते रविंद्रनगर या १५ मीटर रूंद विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. १४,९६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३३ :**

कार्यकारी अभियंता (ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहराच्या ज्या भागात जलवाहिनीद्वारे पुरेसा पाणी पुरवठा होत नाही, अशा भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे टँकर कमी पडत असल्यामुळे भाडेतत्वावर खाजगी टँकर लवण्यासाठी रक्कम रू.४३.०७ लक्ष अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. दि.२.३.०९ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.४८५ दिनांक २.३.०९ अन्वये अंदाजपत्रकास मान्यता प्रदान केली आहे.

भाडेतत्वावरील वॉटर टँकरचे दर निश्चित करून वार्षिक करार करण्याच्या कामासाठी ई-निविदा विभागातर्फे निविदा कार्यवाही केली असता एकुण तीन दर भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | ठेकेदार | क्षमता | प्राप्त दर | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रति दिन | प्रति कि.मी. |
| १. | मे.सचिन वॉटर सप्लायर्स, औरंगाबाद | ५००० लि. | ८००.०० | ११.७५ |
| | | १०००० लि. | १३००.०० | १५.०० |
| २. | मे. अनुयोग कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | ५००० लि. | ८९०.०० | १२.९० |
| | | १०००० लि. | १३९०.०० | १५.९० |
| ३. | मे.गुरूदत्त ट्रान्सपोर्ट, औरंगाबाद | ५००० लि. | १२००.०० | १२.०० |
| | | १०००० लि. | १६००.०० | १६.०० |

तुलनात्मकदृष्ट्या मे.सचिन वॉटर सप्लायर्स, औरंगाबाद यांचे दर ५००० लिटर व १०००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टँकर करीता प्रति दिन व प्रति किलोमीटर दर सर्वात कमी आहे. उपरोक्त दरास मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सादर करण्याची शिफारस केली आहे.

तरी मे.सचिन वॉटर सप्लायर्स, औरंगाबाद यांच्या सर्वात कमी दरास मान्यता मिळणेस्तव व वार्षिक करार करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे टँकर कमी पडत असल्यामुळे भाडेतत्वावर खाजगी टँकर लवण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर असलेले ५००० लि. क्षमतेच्या टँकरसाठी रू.८००/- प्रतिदिन व ११.७५ प्रति कि.मी. व १०००० लि. क्षमतेच्या टँकरसाठी १३००/-प्रतिदिन व १५.०० प्रति कि.मी. या मे.सचिन वॉटर सप्लायर्स, औरंगाबाद यांच्या दरास व वार्षिक करार करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३४ :**

कार्यकारी अभियंता (इ/फ) प्रस्ताव सादर करत आहेत की, घंटागाड्या खरेदी या कामाचे मागील वर्षाच्या मंजुर दराने रू.६१४५/- प्रमाणे १५० नगर घंटागाड्या खरेदीसाठी रूपये ९,२१,७५०/- खर्च अपेक्षीत आहे. या कामाचा खर्च सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात लँड फिलींग/नागरी घन कचरा व्यवस्थापन या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर काम तातडीने करणे आवश्यक आहे.

करीता स्थायी समितीमध्ये मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम २ (२) अंतर्गत मंजुरीकरीता प्रस्ताव सादर करीत आहे. सदर खर्चास मा.आयुक्त यांनी शिफारस करून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत आदेशीत केले आहे.

त्यानुसार उपरोक्त रक्कम रू.९,२१,७५०/- चे काम मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम २ (२) अंतर्गत सुर्या फेब्रीकेटर्स मार्फत करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घंटागाड्या खरेदी करीता मागील वर्षाच्या मंजुर दराने रू.६१४५/- प्रमाणे १५० नगर घंटागाड्या खरेदीसाठी लागणारा खर्च रू.९,२१,७५०/- व सदर काम मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम २ (२) अंतर्गत सुर्या फेब्रीकेटर्स मार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३५:**

प्रस्ताव सादर करणेत येतो की, महापालिका हद्दीतील सर्व नळधारकांना पाणीपट्टीचे सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाची बिले वाटप करून वसुल करणे गरजेचे आहे. मागील वर्षी सन २००८-२००९ मध्ये पाणीपट्टीचे मागणी बिले वेळेवर वितरीत न झाल्याने पाणीपट्टी वसुली कमी झालेली आहे. सन २००७-२००८ मध्ये महापालिकेतर्फे पाणीपट्टीचे संगणकीय बिले तयार करणेचे काम भक्तीज कॉम्प्युटर यांना देणेत आलेले होते. सन २००७-२००८ मध्ये निविदा देऊन सदरील काम भक्तीज कॉम्प्युटरला देणेत आले होतजे. सद्य:स्थितीत कर्मचारी पाणीपट्टीची बिले हस्तलिखीत करून देत असल्यामुळे त्यास मोठ्या प्रमाणावर वेळ लागत आहे व त्यामुळै वसुलीवर त्याचा परिणाम होत आहे.

सन २००९-२०१० करीता मागणी बिले तयार करून घेणे गरजेचे असल्याने, संबंधीत भक्तीज कॉम्प्युटर एजन्सी कडून संगणकीय बिले तयार करून घेवून वाटप केल्यास पाणीपट्टीचे वसुलीमध्ये वाढ नक्कीच होण्यास मदत मिळेल. सदर एजन्सीकडे पुर्वीचा डाटाबेस तयार असल्यामुळे त्यास अद्यावत करून बिले काढणे सोयीचे आहे.

संबंधीत एजन्सीकडे Software तयार असून मागणी बिले तयार करणे करिता त्यांना जास्त अवधी लागणार नाही व मनपाचे मागणी बिले वाटपाचे काम लवकर होईल. या अनुषंगाने सदर भक्तीज कॉम्प्युटर्स यांचे सन २००७-२००८ चे मंजुर निविदा प्रमाणे व वाटाघाटीअंती या दरास मा.आयुक्तांची मंजुरी मिळालेली आहे. त्यामुळे सन २००७-२००८ मधील वाटाघाटी अंती निश्चित मंजुर दराने विना निविदा संबंधीत एजन्सी कडून सन २००९-१० चे पाणीपट्टीचे मागणी बिले तयार करून घेणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका हद्दीतील सर्व नळधारकांना पाणीपट्टीचे सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाची बिले वाटप करून वसुल करणेस्तव भक्तीज कॉम्प्युटर्स यांचे सन २००७-२००८ चे मंजुर निविदा प्रमाणे व वाटाघाटीअंती मंजुर दराने विना निविदा संबंधीत एजन्सी कडून सन २००९-१० चे पाणीपट्टीचे मागणी बिले तयार करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३६ :**

प्रकल्प संचालक तथा घन कचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग ड भागातील घनचकरा व्यवस्थापवन हाताळणी नियम २००० अंतर्गत साफसफाईसाठी व डोअर टु डोअर कलेक्शनसाठी कंत्राटदारांना काम देण्यात आले होते. प्रभाग अधिकारी व संबंधीत स्वच्छता निरीक्षक, प्रभाग ड यांनी जा.क्र.मनपा/प्रभाग ड/२००९/१३३२ दि.२१/८/२००९ अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार प्रभाग ड मधील भाग अ मधील साफसफाई व डोअर टु डोअर कलेक्शनचे काम कंत्राटदारांनी समाधानकारक केले असल्याबाबत कळविले आहे. तसेच जुन ०९ ते ऑगष्ट ०९ दरम्यान खालील कंत्राटदारांनी केलेल्या कामास मा.आयुक्तांची कार्योत्तर मान्यता दि.३१/८/०९ नुसार दिली आहे.

साफसफाईचे काम

| भाग | साफसफाईचे कंत्राटदाराचे नांव | मुदतवाढ | बोली द.म. देय रू. | देयक रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| अ | मे.ईश्वरलाल खरे | १ जुन ०९ ते ३१ ऑगष्ट ०९ | ३,३६,३०२/- | १०,०८,९०६/- |

डोअर टु डोअर कलेक्शनचे काम

| भाग | साफसफाईचे कंत्राटदाराचे नांव | मुदतवाढ | बोली द.म. देय रू. | देयक रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| अ | मे.जागृती इंटरप्रायजेस | १ जुन ०९ ते ३१ ऑगष्ट ०९ | ३,०१,६६२/- | ०९,०४,९८६/- |

प्रभाग अधिकारी, प्रभाग ड यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार उपरोल्लेखित कालावधीत वरील कंत्राटदारांनी केलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग ड भाग-अ मधील ०१ जुन ते ३१ ऑगष्ट २००९ या कालावधीत साफसफाईसाठी व डोअर टु डोअर कलेक्शनसाठी कंत्राटदारांनी केलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

साफसफाईचे काम-

| भाग | साफसफाईचे कंत्राटदाराचे नांव | मुदतवाढ | बोली द.म. देय रू. | देयक रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| अ | मे.ईश्वरलाल खरे | १ जुन ०९ ते | ३,३६,३०२/- | १०,०८,९०६/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ३१ ऑगष्ट ०९ | | |

डोअर टु डोअर कलेक्शनचे काम

| भाग | साफसफाईचे कंत्राटदाराचे नांव | मुदतवाढ | बोली द.म. देय रू. | देयक रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| अ | मे.जागृती इंटरप्रायजेस | १ जुन ०९ ते<br>३१ ऑगष्ट ०९ | ३,०१,६६२/- | ०९,०४,९८६/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३७ :**

शिक्षणाधिकारी, म.न.पा. औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००९-१० या शैक्षणिक वर्षासाठी मनपाच्या १२ शाळेत आठवीचे वर्ग सुरू करण्याची शासनाने मान्यता प्रदान केली आहे. या आठवीच्या विद्यार्थ्यांना आसन व्यवस्थासाठी ड्युलडेस्क ची आवश्यकता आहे.

यासाठी महाराष्ट्र शासनाचे लाकडी फर्निचरचे दरपत्रका नुसार क्रमांक ६८ वरील तपशील प्रमाणे ड्युल डेस्क चा दर रू.२८१२/- एवढा आहे. (दराची मुदत ३०/६/२००९) सदर दरावर औरंगाबाद मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था मर्यादित, जनता बाजार को-ऑपरेटीव्ह डिपार्टमेंटल स्टोअर्स यांनी २% कमी करून पुरवठा करण्याची तयारी दर्शविली आहे. यानुसार प्रति ड्युल डेस्क रू.२७५५/- एवढा ठरतो. विद्यार्थी संख्येनुसार ४१९ ड्युलडेस्क खरेदी रू.११,५४,३४५/- खर्च अपेक्षीत आहे. तरी औरंगाबाद मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था कडुन ड्युल डेस्क चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००९-१० या शैक्षणिक वर्षासाठी मनपाच्या १२ शाळेत आठवीचे वर्ग सुरू करण्याची शासनाने मान्यता प्रदान केल्यानुसार आठवीच्या विद्यार्थ्यांना आसन व्यवस्थासाठी ड्युलडेस्क खरेदीस्तव महाराष्ट्र शासनाचे लाकडी फर्निचरचे दरपत्रकानुसार ड्युल डेस्क च्या दरावर २% दर कमी करून प्रति ड्युल डेस्क रू.२७५५/- या दराने विद्यार्थी संख्येनुसार ४१९ ड्युल डेस्क साठी अपेक्षीत खर्च रू.११,५४,३४५/- व औरंगाबाद मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था कडुन ड्युल डेस्क खरेदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३८:**

शिक्षणाधिकारी, म.न.पा. औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात मनपातील इयत्ता २ री ते ७ वी या वर्गात शिक्षण घेणाऱ्या मराठी व उर्दु माध्यमाच्या विद्यार्थीनींना दफ्तर वाटप करण्यात आले. शिक्षण समितीच्या बैठकीत मनपाच्या विद्यार्थ्यांना देखील दफ्तर देण्याबाबत चर्चा झाली.

त्यानुसार ११ हजार विद्यार्थ्यांसाठी दफ्तराची खरेदी शासनाचे परिपत्रक क्र.एसएसए २००९/प्र.क्र.२६/प्रा.शि.४ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक २२/१/२००९ अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार रेक्झीनचे तीन कप्पे १२ इंच x १८ इंच या प्रकाराच्या रूपये १९०/- व्हॅट करासह रू.२१४/- प्रति नग व निश्चित केलेले फर्म महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झुमर्स फेडरेशन लि., मुंबई यांच्याकडून करावयाची असल्यास रू.२३,५४,०००/- खर्च येणार असुन उक्त शासन दरानुसार खरेदीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे , शिक्षण समितीच्या बैठकीत मनपा शालेय विद्यार्थ्यांना दफ्तर देण्याबाबत चर्चा झाल्यानुसार सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात मनपातील इयत्ता २ री ते ७ वी या वर्गात शिक्षण घेणाऱ्या मराठी व उर्दु माध्यमाच्या विद्यार्थीनींना दफ्तर वाटप करण्यात आले त्याप्रमाणे

इतर ११ हजार विद्यार्थ्यांसाठी दफ्तराची खरेदी शासनाचे दिनांक २२/१/२००९ च्या परिपत्रकान्वये निश्चित केलेल्या दरानुसार रेक्झीनचे तीन कप्पे १२ इंच x १८ इंच या प्रकाराच्या रूपये १९०/- व्हॅट करासह रू.२१४/- प्रति नग व निश्चित केलेले फर्म महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झुमर्स फेडरेशन लि., मुंबई यांच्याकडून खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रू.२३,५४,०००/- खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३९ :**

शिक्षणाधिकारी, म.न.पा. औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केले आहे की, सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात मनपाच्या १२ शालेय इयत्ता ८ वी च्या वर्ग शासनाने परवानगी दिलेली आहे. या शाळात विज्ञान साहित्य खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कंझुमर्स फेडरेशन लि. मुंबई यांच्याकडुन पाप्त झालेल्या दरपत्रकानुसार १०० विविध साहित्याचा संचाचा दर ५६,५००/- एवढा आहे. साधारण १८ संच खरेदीसाठी १०,१७,०००/- रूपये खर्च अपेक्षीत आहे.

तरी महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कंझुमर्स फेडरेशन लि. मुंबई-३२ यांच्या दरपत्रकानुसार खरेदीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात मनपाच्या १२ शालेय इयत्ता ८ वी च्या वर्गासाठी या शाळात विज्ञान साहित्य खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कंझुमर्स फेडरेशन लि. मुंबई यांच्याकडुन प्राप्त झालेल्या दरपत्रकानुसार प्रति संच ५६,५००/- या दराने १८ संच खरेदीसाठी लागणाऱ्या १०,१७,०००/- रूपये अपेक्षीत खर्चास व महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कंझुमर्स फेडरेशन लि. मुंबई-३२ यांच्या दरपत्रकानुसार खरेदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४० :**

शिक्षणाधिकारी, म.न.पा.औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००९-१० या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आसन पट्टी खरेदी करावयाची आहे. आसन पट्टी खरेदीसाठी महाराष्ट्र शासनाच्या हातमागावरील कापडाची दर निश्चिती दिनांक २४/७/२००९ नुसार ११२.४० पैसे प्रति चौरस मिटर असा आहे. या दरावर औरंगाबाद मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था मर्यादीत जनता बाजार को-ऑप. डिपार्टमेंटल स्टोअर्स यांनी २% दर कमी करून पुरवठा करण्यास तयार असल्याने पत्र देण्यात आले आहे. त्यानुसार मनपा शिक्षण विभागास २x१० या साईजची पट्टी खरेदी करण्यासाठी २२०.३० पैसे प्रति नग खर्च येईल.

शिक्षण विभागात अंदाजीत ४५५५ नग खरेदीसाठी १०,०३,४६६/- रू. खर्च अपेक्षीत आहे. तरी औरंगाबाद मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्थाकडुन आसन पट्टी खरेदीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००९-१० या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या हातमागावरील कापडाची दर निश्चिती दि.२४/७/२००९ नुसार औरंगाबाद मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था मर्यादीत जनता बाजार को-ऑप. डिपार्टमेंटल स्टोअर्स यांनी २% दर कमी करून पुरवठा करण्यास तयार असल्याचे दिलेल्या संमतीनुसार २x१० या साईजची आसन पट्टी खरेदी करण्यासाठी २२०.३० पैसे प्रति नग प्रमाणे शिक्षण विभागात अंदाजीत ४५५५ नग खरेदीसाठी १०,०३,४६६/- रू. च्या अपेक्षीत खर्चासह औरंगाबाद मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्थाकडुन आसन पट्टी खरेदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४१ :**

उप आयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शिक्षण विभागांतर्गत सर्व शिक्षा अभियानामार्फत विविध ठिकाणी वर्ग खोल्या बांधण्याचे काम पुर्ण झाले असुन नव्याने बांधलेल्या इमारतींची उपद्रवी लोकांपासून/मुलांपासुन नासधुस होण्याची शक्यता असल्यामुळे सदर ठिकाणी सुरक्षा रक्षकांची आवश्यकता आहे. तसेच हर्सुल, नक्षत्रवाडी, प्रियदर्शनी इंदिरानगर या शाळेवर यापुर्वी काचा फोडणे, शालेय साहित्याची चोरी करणे संगणक चोरी करण्याचा प्रयत्न झालेला आहे. तसेच नव्याने बांधलेल्या इमारतींचीही तोडफोड होत आहे व वारंवार चोरी करण्याचे प्रयत्न होत आहेत. महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागाकडे मनुष्यबळ कमी असल्यामुळे पशुधन विभागात स्थायी समिती ठराव क्रमांक २५९ अन्वये मे. महाराणा सेक्युरिटी व लेबर सप्लायर्स, खडकेश्वर या एजन्सी मार्फत सुरक्षा रक्षक लावण्यास मंजुरी मिळालेली आहे. विना हत्यारी सुरक्षा रक्षक ४९५०/- रूपये प्रति माह या दराने कार्यालयीन आदेश पत्र क्र.मनपा/मुपसंअ/७६५/२००९, दि.२९-८-२००९ अन्वये नेमण्यात आलेले आहेत. त्याच धर्तीवर व त्याच एजन्सीकडून शिक्षण विभागाकरीता १० सुरक्षा रक्षक लावण्याचा प्रस्ताव ादर केला असता, त्यास मा.आयुक्तांची मान्यता प्राप्त आहे.

करीता याच एजन्सी कडून म्हणजेच मे.महाराणा सेक्युरिटी व लेबर सप्लायर्स, खडकेश्वर यांचे मंजुर दर रू.४९५०/- प्रतिमाह म्हणजेच त्याच दरामध्ये आदेश दिल्यापासुन एक वर्षासाठी शिक्षण विभागाकरीता शाळेच्या सुरक्षेकरीता विना हत्यारी रात्रपाळीसाठी विविध शाळेवर दहा सुरक्षा रक्षक लावण्याच्या परवानगीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिक्षण विभागांतर्गत सर्व शिक्षा अभियानामार्फत विविध ठिकाणी बांधलेल्या वर्ग खोल्या इमारतींची उपद्रवी लोकांपासून/मुलांपासुन नासधुस होण्याची शक्यता असल्यामुळे सुरक्षेसाठी स्थायी समिती ठराव क्रमांक २५९ अन्वये मे. महाराणा सेक्युरिटी व लेबर सप्लायर्स, खडकेश्वर या एजन्सी मार्फत मंजुरी मिळाल्याप्रमाणे ४९५०/- रूपये प्रतिमाह या दराने संबंधीत एजन्सीकडून शिक्षण विभागाकरीता १० सुरक्षा रक्षक आदेश दिल्यापासुन एक वर्षासाठीशाळेच्या सुरक्षेकरीता विना हत्यारी रात्रपाळीसाठी विविध शाळेवर दहा सुरक्षा रक्षक लावण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४२ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराचा सोलार सिटी योजने अंतर्गत समावेश करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सदरील योजना नवीन, नविनीकरण उर्जा मंत्रालय, नवी दिली यांचे मार्गदर्शक तत्वानुसार राबविण्यात येणार आहे. यासाठी रूपये ५०.०० लक्ष पर्यंतचा निधी सदरील योजना मंजूर झाल्यास शासनाकडून अनुदान स्वरूपात प्राप्त होणार आहे. तरी औरंगाबाद शहराचा सोलार सिटी अंतर्गत समावेश करण्यासाठीचा प्रस्ताव महाऊर्जा/नवीन, नविनीकरण ऊर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचा सोलार सिटी योजने अंतर्गत समावेश करण्यासाठी तसेच महाऊर्जा/नवीन, नविनीकरण ऊर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविणेसाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाचे वतीने नुकतेच महिलांसाठी सर्वच क्षेत्रामध्ये ५०% आरक्षणाचे धोरण जाहीर केलेले आहे. महिलांसाठी मिळालेल्या आरक्षणानुसार भविष्यात सर्वच क्षेत्रामध्ये महिलांना मोठ्या प्रमाणावर पुढे येण्यासाठी संधी मिळणार आहे. सध्या देशाच्या सर्वोच्च पदावर महिला राष्ट्रपती तसेच लोकसभेच्या सभापती पदावर महिला अध्यक्ष म्हणुन उत्कृष्ट रितीने काम करत आहेत.

केंद्र शासनाचे वतीने महिला आरक्षणाचे विधेयक मंजुर करून घेतल्याबद्दल भारताचे पंतप्रधान मा.मनमोहनसिंगजी, मा.पक्षाध्यक्ष श्रीमती सोनियाजी गांधी, राष्ट्रपती महोदया मा.सौ.प्रतिभाताई पाटील यांचे या सभागृहात अभिनंदन करण्यात यावे व तशा आशयाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात यावा. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती खान मेहरून्नीसा अनुमोदक : श्रीमती मोमीन सफिया फिरदौस, डॉ.दत्ता पाथ्रीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र शासनाचे वतीने महिला आरक्षणाचे विधेयक मंजुर करून घेतल्याबद्दल भारताचे पंतप्रधान मा.मनमोहनसिंगजी, मा.पक्षाध्यक्ष श्रीमती सोनियाजी गांधी, राष्ट्रपती महोदया मा.सौ.प्रतिभाताई पाटील यांचे अभिनंदनाचा ठराव सभागृहाच्या वतीने बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

'राष्ट्रगीता'नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद